वाचा:- १.ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र.लेखाप -२०१३/प्र.क्र.८१/वित्त-५/ दिनांक १८.०२.२०१४
२. संचालनालयाचे पत्र क्र. स्था.१८/ब/ अभिलेखे उपलब्ध / दंडात्मक कारवाई/ वलेप अहवाल /१२६९, दि. ०८.०८.२०१४.
३. संचालनालयाचे पत्र क्र. स्था.१८/ब/ अभिलेखे उपलब्ध / दंडात्मक कारवाई/ वलेप अहवाल /११८३, दि. १६.०७.२०१५.

---

**स्था-१८/ ब / अहवाल शाखा / वलेप अहवाल /न.क्र. २३३/**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सहावा मजला,कोकण भवन,**
**नवी मुंबई ४०० ६१४**

**स्थायी आदेश क्रमांक** ०२ **/ २०१७** **दिनांक** - 2 FEB 2017

**विषय :- लेखापरीक्षणासाठी विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणेबाबत.**

**प्रस्तावना:-**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ मध्ये (सुधारणा २०११ मधील कलम ८) " जी कोणतीही व्यक्ती कलम ६, पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणुनबुजून दुर्लक्ष करील किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल, ती दंडाधिकाऱ्यापुढे सिध्दापराध ठरविण्यात आल्यानंतर २५,०००/- रुपयापर्यंत असु शकेल इतक्या दंडास पात्र होईल" अशी तरतुद आहे.

उपरोक्त संदर्भिय वाचा क्र. ०१ अन्वये ग्रामविकास विभागाने लेखापरीक्षणासाठी विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव संबंधित संस्थांचे लेखापरीक्षण संपल्यानंतर १ महिन्याच्या आत विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार संचालनालयाने संदर्भिय वाचा क्र. ०२ व ०३ अन्वये सर्व विभागीय सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक यांना कार्यवाही करण्याबाबत अवगत केले आहे.

लेखापरीक्षणासाठी विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास विभागीय आयुक्त यांना सादर करावयाच्या दंडात्मक कारवाईचा प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे:-

**आदेश:-**

१. स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षणादरम्यान संबंधित संस्थेकडून अभिलेखे उपलब्ध न झाल्यास जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयांनी दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करावा व त्याची एक प्रत सह संचालक विभागीय कार्यालयास सादर करावी.
२. संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न झाल्याने नोंदविलेल्या लेखाआक्षेपामध्ये विभागीय आयुक्त यांचेकडे सादर केलेल्या दंडात्मक कारवाईच्या प्रस्तावाचा तपशिल (पत्राचा क्रमांक व दिनांक) नमुद करावा.

३. जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभागाच्या नियमित लेखापरीक्षण अहवालात ज्या ग्रामपंचायतींनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत, अशा सर्व ग्रामपंचायतींच्या संदर्भात एक सामाईक परिच्छेद अंतर्भूत करावा.

४. विभागीय आयुक्त यांना सादर केलेल्या दंडात्मक कारवाईच्या प्रकरणांची नोंदवही खाली दिलेल्या नमुन्यात जिल्हा सहाय्यक संचालक व विभागीय सह संचालक कार्यालयांनी ठेवावी.

**विभागीय आयुक्त यांना सादर केलेल्या दंडात्मक कारवाईंच्या प्रस्तावांबाबत नोंदवही**

**विभाग / जिल्हा:-**

| अ. क्र. | लेखापरीक्षण केलेल्या संस्थेचे नाव | लेखापरीक्षण वर्ष व लेखाआक्षेप क्रमांक | ज्याबाबींचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नाहीत त्यांचा संक्षिप्त तपशिल | विभागीय आयुक्त यांचेकडे दंडात्मक कारवाई प्रस्तावित केलेल्या पत्राचा क्र. व दि. | दंडात्मक कारवाईबाबत प्रस्तावित केलेली रक्कम (रु) | विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव:-

विभागीय सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा.